आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१० जानेवारी २०२६ - शनिवार

**ठळक बातम्या**

- पुणे महानगरपालिकेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा संयुक्त जाहीरनामा प्रसिद्ध

- विरोधकांच्या टीकेनंतर बदलापूर लैंगिक शोषण प्रकरणातला सहआरोपी तुषार आपटेचा बदलापूर नगर परिषदेतल्या स्वीकृत नगरसेवक पदाचा राजीनामा

- गहिनीनाथगड आणि पंढरपूर यादरम्यानचा पालखीमार्ग विकसित करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन

आणि

- महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत पहिल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू संघाचा गतविजेत्या मुंबई इंडियन्सवर ३ खेळाडू राखून विजय

<><><><><>

पुणे महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं आज संयुक्त जाहीरनामा प्रसिद्ध केला. आपल्या जाहीरनाम्यात पुण्यातल्या प्रमुख नागरी समस्यांवर लक्ष केंद्रित केल्याचं उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी सांगितलं. पक्षाच्या कार्यकारी अध्यक्ष सुप्रिया सुळे याही यावेळी उपस्थित होत्या. पाणीपुरवठा, वाहतूक कोंडी सोडवणं, खड्डेमुक्त रस्ते, स्वच्छता, अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त आरोग्य सुविधा, प्रदूषण नियंत्रण आणि झोपडपट्टी पुनर्वसनावर या जाहीरनाम्यात भर दिला आहे. लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी आणि कौशल्य प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या महिलांना ५ लाख रुपयांपर्यंत व्याजमुक्त कर्ज देणं, दीडशे पुणे मॉडेल स्कूल, विद्यार्थ्यांना मोफत टॅब, ५०० चौरस फुटापर्यंतच्या घरांना मालमत्ता कर माफी यासारखी आश्वासन यात आहेत.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१० जानेवारी २०२६ - शनिवार

<><><><>

मिरा-भाईंदर महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपनं काल जाहीरनामा प्रसिद्ध केला. १०० नवे काँक्रीट रस्ते, ३०० खाटांचं पालिका रुग्णालय, प्रदूषणमुक्तीसाठी उपाययोजना इत्यादी आश्वासनं भाजपानं या जाहीरनाम्यातून दिली आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि स्थानिक आमदार नरेंद्र मेहता यांच्या उपस्थितीत हा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. मिरा-भाईंदरमध्ये भाजप आणि शिवसेना स्वतंत्र लढत आहेत.

<><><><>

अंबरनाथमध्ये काँग्रेसच्या १२ नगरसेवकांनी भाजपाशी हातमिळवणी करण्यापूर्वी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांची परवानगी घ्यायला हवी होती आणि त्यानंतर भाजपाशी अलिखित युती करायला हवी होती, असं केलं असतं, तर पक्षातून त्यांचं निलंबन टाळता आलं असतं, असं मत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शिवाजीराव मोघे यांनी आज व्यक्त केलं. अंबरनाथ नगरपरिषदेत निवडून आलेल्या भाजपा आणि काँग्रेसच्या नगरसेवकांनी अंबरनाथ विकास आघाडी या नावानं आघाडी स्थापन केली होती. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षही या आघाडीचा भाग होता. या हातमिळवणीमुळे काँग्रेसनं या १२ नगरसेवकांना पक्षातून काढून टाकलं होतं, त्यानंतर त्यांनी भाजपात प्रवेश केला.

<><><><>

बदलापूर लैंगिक शोषण प्रकरणातला सह-आरोपी तुषार आपटे यांनं ठाणे जिल्ह्यातल्या कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेतल्या 'स्वीकृत' नगरसेवक पदाचा राजीनामा दिला आहे. भारतीय जनता पक्षानं काल त्याची स्वीकृत नगरसेवक म्हणून नियुक्ती केली होती. त्यानंतर विरोधकांनी त्याच्यावर टीका केली होती.

भाजपाचा हा निर्णय दुर्दैवी असल्याचं मत मुंबई काँग्रेस समितीच्या अध्यक्ष वर्षा गायकवाड यांनी आज मांडलं. तर, बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातल्या सह-आरोपीला स्वीकृत नगरसेवक म्हणून संधी देऊन भाजपानं असंवेदनशीलतेचा कळस गाठला असून,

आपलं प्राधान्य कशाला आहे, हे दाखवून दिल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकारी अध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी केली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनीही या निर्णयावरून भाजपावर निशाणा साधला आहे. कुटुंबातल्या मुली सुरक्षित ठेवायच्या असतील तर भाजपला मतदान करू नका, असं आवाहन वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी याप्रकरणावरुन केलं आहे.

बदलापूर लैंगिक शोषण प्रकरणाची तक्रार दाखल न केल्याबद्दल संबंधित शाळा व्यवस्थापनाविरोधात गुन्हा दाखल झाला होता. या घटनेनंतर ४४ दिवसांनी संस्थेचा तत्कालीन सचिव आपटे यांना अटक करण्यात आली, आणि ४८ तासांत त्यांना जमीन मंजूर झाला. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

<><><><><>

भारतीय जनता पार्टीनं पक्षाच्या मुंबई आणि नागपूरमधल्या ५८ पदाधिकाऱ्यांना पक्षविरोधी कारवाया आणि बेशिस्त वर्तणुकीबद्दल सहा वर्षांसाठी निलंबित केलं आहे. निलंबित नेत्यांमध्ये माजी महापौर, नगरसेवक आणि प्रमुख कार्यकर्त्यांचा समावेश आहे. पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरुद्ध बंडखोरी करणं, पक्षाची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करणं, महायुतीच्या उमेदवारांना सहकार्य न करणं इत्यादी आरोप या पदाधिकाऱ्यांवर आहेत, अशी माहिती भारतीय जनता पक्षाच्या सूत्रांनी आज दिली.

<><><><><>

छत्रपती संभाजीनगरमध्ये MIM च्या उमेदवारासह ११ जणांविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. दुसऱ्या उमेदवाराच्या प्रचारात अडथळे आणल्याचा आरोप त्यांच्यावर आहे.

<><><><><>

५३वा नवी दिल्ली जागतिक पुस्तक महोत्सव आजपासून भारत मंडपम इथं सुरू झाला. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी या महोत्सवाचं उद्घाटन केलं. प्रकाशक, लेखक, वाचक आणि सांस्कृतिक वर्तुळातले प्रतिनिधी ९ दिवसांच्या या महोत्सवात एकत्र येत

आहेत. ३५ देशांमधल्या १ हजारापेक्षा जास्त प्रकाशकांनी यात भाग घेतला आहे. विविध विषयांवरची असंख्य पुस्तकं इथं वाचकांसाठी उपलब्ध आहेत. यंदा या महोत्सवाची मध्यवर्ती संकल्पना, 'भारताचा लष्करी इतिहासः शौर्य आणि बुद्धिमत्तेची ७५ वर्षं' अशी आहे. या विशेष दालनात या संकल्पनेशी संबंधित ५०० पेक्षा जास्त पुस्तकं आणि शंभरपेक्षा जास्त कार्यक्रम नागरिकांना अनुभवता येणार आहेत.

<><><><><>

बीड जिल्ह्यात गहिनीनाथगड आणि पंढरपूर यादरम्यानचा, पालखी सोहळ्यासाठी वापरला जाणारा रस्ता विकसित करू, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिलं. गहिनीनाथगडावर वामनभाऊ महाराज यांच्या ५०व्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. गहिनीनाथगडानं दूरदूरच्या नागरिकांना अध्यात्माशी जोडलं, असं ते यावेळी म्हणाले. गहिनीनाथगडाच्या विकासासाठीही राज्य सरकारनं योजना तयार केली असून त्याचं काम सुरू असल्याचंही फडणवीस यांनी सांगितलं.

<><><><><>

बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूकीसाठी मतदान करण्याचं आवाहन ज्येष्ठ अभिनेते शिवाजी साटम यांनी केलं आहे.

***होल्ड... बाईट- शिवाजी साटम***

<><><><><>

राज्यात यंदा रबी हंगामातील सरासरी पेरण्या उद्दिष्टापेक्षा जास्त झाल्या आहेत. मुख्य पीक असलेल्या गहू आणि हरभऱ्याच्या शंभर टक्के पेरण्या पूर्ण झाल्या असून ज्वारीची पेरणी ८४ टक्क्यांवर पोहोचली आहे. एकंदर रब्बी हंगामातील पिकांच्या पेरणीनं सरासरी ओलांडली असून १०१ टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. राज्यात यंदा पाण्याची उपलब्धता चांगली असून यापुढेही हवामानाने अनुकूल साथ दिल्यास रब्बी हंगाम चांगला होण्याचा प्राथमिक अंदाज पुणे कृषी विभागाकडून वर्तवण्यात आला आहे.

<><><><><>

ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्ताननं आपल्या  लष्करी आणि घटनात्मक संरचनेत तातडीनं केलेले बदल म्हणजे भारताशी झालेल्या संघर्षादरम्यान त्यांच्या यंत्रणेतल्या गंभीर त्रुटींचं निदर्शक आहे, असं प्रतिपादन संरक्षणदलप्रमुख जनरल अनिल चौहान यांनी काल केलं. पुणे सार्वजनिक धोरण महोत्सवात, तंत्रज्ञान आणि राष्ट्रीय सुरक्षा या विषयावरच्या सत्रात ते बोलत होते. ऑपरेशन सिंदूरला फक्त स्वल्पविराम दिलेला आहे, याचा पुनरुच्चार त्यांनी केला. भारतीय सशस्त्र दलं इंटरनेट-केंद्रित युद्धनीतीकडून डेटा-केंद्रित युद्धनीतीच्या दिशेनं जात असून भविष्यातल्या सुरक्षाविषयक आव्हानांचा सामना करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता महत्त्वाची भूमिका बजावत आहे, असं चौहान यांनी सांगितलं.

<><><><><>

२२ वा थर्ड आय आशियाई चित्रपट महोत्सव कालपासून मुंबईत सुरू झाला. या महोत्सवात सुप्रसिद्ध दिग्दर्शक, पद्मभूषण सई परांजपे यांना 'आशियाई चित्रपट संस्कृती पुरस्कारानं गौरवण्यात आलं, तर दिग्दर्शिका उमा दा कुन्हा यांना सत्यजित रे स्मृती पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. चित्रपती डॉक्टर व्ही. शांताराम यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्षानिमित्त यावर्षीपासून उत्कृष्ट दिग्दर्शकीय पदार्पण हा पुरस्कार सुरू करण्यात आल्याची घोषणा तसंच डॉ. व्ही. शांताराम यांच्यावरच्या चित्रपटाची घोषणा महोत्सवाचे अध्यक्ष किरण शांताराम यांनी केली.

<><><><><>

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २८ जानेवारी ते २ एप्रिल यादरम्यान होणार आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी ही माहिती दिली. या अधिवेशनाचा पहिला टप्पा १३ फेब्रुवारी रोजी संपेल आणि दुसरा टप्पा ९ मार्च रोजी सुरू होईल. हे अधिवेशन म्हणजे अर्थपूर्ण चर्चा आणि नागरिक-केंद्रित प्रशासनाच्या दिशेनं एक महत्त्वाचं पाऊल असल्याचं रिजिजू यांनी सांगितलं.

<><><><><>

मुंबईच्या गोरेगाव भागात भगतसिंह नगर इथं लागलेल्या आगीत तीन जण मृत्यूमुखी पडले, तर तीन जण जखमी झाले. आज पहाटे तीनच्या सुमाराला ही घटना घडल्याचं संबंधित सूत्रांनी सांगितलं.

<><><><><>

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आज गुजरात जायंट्स आणि यूपी वॉरियर्स या संघांदरम्यान नवी मुंबईत रंगणार आहे. युपी वॉरियर्सनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

कालपासून या स्पर्धेला सुरुवात झाली आहे. पहिल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू संघानं गतविजेत्या मुंबई इंडियन्सवर ३ खेळाडू राखून विजय मिळवला. नवी मुंबई इथं झालेल्या या सामन्यात आधी फलंदाजी करताना मुंबई संघानं निर्धारित २० षटकांत ६ खेळाडू गमावून १५४ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू संघानं २० षटकांत ७ खेळाडूंच्या मोबदल्यात १५७ धावा फटकावल्या आणि सामना जिंकला.

//<><><><><>//